सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

## विधि व न्याय विभाग

**( सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ )**

# महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४

(१९ सप्टेंबर, २०११ पर्यंत सुधारित)

Maharashtra Act No. XIV of 1974

# The Maharashtra Restoration of Lands to Scheduled Tribes Act, 1974

( As amended upto 19th September, 2011 )

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांनी मुद्रित केले आणि संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन, मुंबई-४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२०१३

[किंमत : रु. ६-००]

## महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४

अनुक्रमणिका

**उद्देशिका**


| **कलमे** | | | | | **पृष्ठे** |
|---|---|---|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | .. | .. | .. | २ |
| २. | व्याख्या. | .. | .. | .. | २ |
| ३. | विवक्षित प्रकरणात जमातीच्या व्यक्तींना जमिनी प्रत्यर्पित किंवा हस्तांतरित करणे. | | | .. | ३ |
| ४. | अनुसूचित जमातीतील व्यक्तींच्या मालकीच्या जमिनी प्रत्यर्पित करणे. | | .. | .. | ६ |
| ५. | विवक्षित प्रकरणी जमिनीचा भोगवटा केल्याबद्दल भरपाई. | | .. | .. | ७ |
| ५-अ. | प्रत्यर्पित करणे शक्य नसेल, अशा जमिनी शासनाकडे निहित होणे व विवक्षित निर्बंधाच्या अधीन त्या जमातीच्या इतर व्यक्तींना देणे. | | .. | .. | ७ |
| ६. | अपील. | .. | .. | .. | ८ |
| ७. | पुनरीक्षण. | .. | .. | .. | ९ |
| ८. | न्यायालय शुल्क. | .. | .. | .. | ९ |
| ९. | जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय किंवा आदेश आणि महसूल न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असणे. | | | .. | ९ |
| ९-अ. | विधिज्ञ इत्यादींना हजर राहण्यापासून वगळणे. | .. | .. | .. | ९ |
| १०. | दिवाणी न्यायालय किंवा प्राधिकरण यांच्या अधिकारितेस रोध. | | .. | .. | १० |
| १०-अ. | जमिनीचा कब्जा प्रत्यर्पित करण्याचा व तीवर कब्जा असलेल्या व्यक्तीस निष्कासित करण्याचा अधिकार. | | | .. | १० |
| ११. | नियम करण्याचा अधिकार. | .. | .. | .. | १० |

# सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४[१]

# महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४

[ या अधिनियमास दिनांक २८ एप्रिल १९७५ रोजी राष्ट्रपतींची अनुमती मिळाली ; ही अनुमती दिनांक २८ मे १९७५ रोजी महाराष्ट्र, शासन राजपत्र भाग-चार-असाधारण, यामध्ये प्रथम प्रसिद्ध करण्यात आली. ]

या अधिनियमात पुढील अधिनियमांन्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत :---

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ (१९-३-१९७७)*

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३० (१६-८-१९७७)*

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १@ (१-१-१९९१)*

**अनुसूचित जमातींतील व्यक्तींना विवक्षित जमिनी प्रत्यर्पित करण्याची तरतूद करण्याबाबत अधिनियम**

१९६६ चा महा. ४१. **ज्याअर्थी,** शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक आरईव्ही-१०७०/६२४४८-सी, दिनांक १५ मार्च १९७१ द्वारे इतर गोष्टींबरोबरच महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ आणि संबंधित कुळवहिवाटविषयक कायदे यापासून अनुसूचित जमातीतील व्यक्तींना किती प्रमाणात संरक्षण मिळालेले आहे, त्यासंबंधी चौकशी करून राज्य शासनास अहवाल देण्यासाठी आणि इतर गोष्टींबरोबरच विद्यमान तरतुदी जर अपुऱ्या पडत असतील तर त्यामध्ये योग्य अशा सुधारणा सुचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एका समितीची नेमणूक केली होती ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त समितीने ७ एप्रिल १९७२ रोजी राज्य शासनाकडे आपला अहवाल सादर केला ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त समितीने इतर गोष्टींबरोबरच अशी शिफारस केली आहे की, इतर व्यक्तींकडे यथोचितरीत्या हस्तांतरित झाल्या आहेत अशा जमिनी अनुसूचित जमातीतील व्यक्तींना प्रत्यर्पित करण्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त समितीच्या पूर्वोक्त शिफारशींचा विचार केल्यानंतर, महाराष्ट्र शासनाचे असे मत झाले आहे की, अनुसूचित जमातीतील व्यक्तींना विवक्षित जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी ताबडतोब उपाययोजना करण्यात यावी ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पंचविसाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :–

---

१ उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी महाराष्ट्र शासन राजपत्र, १९७४, भाग पाच- पृष्ठ ९६० पहा.

* अधिनियमाचा प्रारंभ दर्शविणारा दिनांक.

@ सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याचे कलम ७ पुढीलप्रमाणे वाचावे :—

जमातीच्या हस्तांतरकाला जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी कार्यवाहीस सुरुवात करणे.

७. शंका निरसनासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा किंवा प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यात काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकाऱ्याने एक तर स्वाधिकारे कार्यवाहीस प्रारंभ केला नसेल किंवा या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात येण्यापूर्वी असल्याप्रमाणेच्या उक्त अधिनियमाच्या कलम ३६ किंवा ३६ अ मध्ये किंवा मुख्य अधिनियमाच्या कलम ३ किंवा ४ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये जमातीच्या हस्तांतरकांकडून, उपरोक्त तरतुदीअन्वये जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी कोणताही अर्ज करण्यात आला नसेल तर, जिल्हाधिकारी, स्वाधिकारे कोणत्याही कार्यवाहीस सुरुवात करण्यास किंवा जमातीचा हस्तांतरक या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या उक्त अधिनियमाच्या किंवा मुख्य अधिनियमाच्या तरतुदीअन्वये जमातीच्या हस्तांतरकाकडे जमीन प्रत्यर्पित करण्यासाठी अर्ज करण्यास सक्षम राहील.

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नेमील अशा तारखेस [१] अंमलात येईल.

व्याख्या **२.** (१) संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर, या अधिनियमात,—

(अ) "संहिता" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ ;

(ब) "जिल्हाधिकारी" या संज्ञेत, अपर जिल्हाधिकारी आणि संहितेखाली जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करणारा किंवा त्याची कर्तव्ये पार पाडणारा सहायक किंवा उप जिल्हाधिकारी आणि या अधिनियमाखाली जिल्हाधिकाऱ्याच्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी राज्य शासनाने विशेषकरून अधिकार प्रदान केलेल्या [२][एखाद्या तहसिलदाराच्या] दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा इतर कोणताही अधिकारी यांचा समावेश असेल ; १९६५ चा महा. ५१.

(क) "आयुक्त" या संज्ञेत अपर आयुक्ताचा समावेश असेल ;

(ड) जमिनीच्या संबंधात "सुधारणा" म्हणजे कोणतेही जलनिस्सारणाचे काम, तटबंदी, बंधारे, विहिरी किंवा शेतीच्या प्रयोजनासाठी करण्यात किंवा ठेवण्यात आलेले, अशा जमिनीशी संबद्ध असलेले इतर कोणतेही बांधकाम आणि अशा जमिनीवरील सर्व संरचना, कायम खिळण्या व झाडे ;

(ई) "जमातेतर" म्हणजे, जी अनुसूचित जमातीची नाही अशी व्यक्ती, आणि त्या संज्ञेत, हितसंबंधातील त्याच्या उत्तराधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(फ) "विहित" म्हणजे, या अधिनियमान्वये केलेल्या नियमाद्वारे विहित ;

(ग) "संबंधित कुळवहिवाट विधि" म्हणजे,—

(एक) राज्याच्या विदर्भ प्रदेशाच्या संबंधात, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन (विदर्भ प्रदेश) अधिनियम, १९५८ ; १९५८ चा मुंबई ९९.

(दोन) राज्याच्या हैदराबाद क्षेत्राच्या संबंधात हैदराबाद कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९५० आणि ; १९५० चा हैदराबाद २१.

(तीन) राज्याच्या उर्वरित भागांच्या संबंधात, मुंबई कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ ; १९४८ चा मुंबई ६७.

(ह) "हितसंबंधातील उत्तराधिकारी" म्हणजे, मृत्युपत्रीय व्यवस्थेद्वारे किंवा मृत्यूनंतरच्या प्रक्रांतिद्वारे जमिनीत हितसंबंध संपादित करते अशी व्यक्ती ;

---

१ १ नोव्हेंबर १९७५ [शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्र. आरईव्ही-१०७४/६२४४८ (दोन)-एल-९, दिनांक १ नोव्हेंबर १९७५ पहा.].

२ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १२, कलम ३ अन्वये 'सहायक किंवा उप जिल्हाधिकाऱ्याच्या' या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(आय) जमिनीच्या संबंधात "हस्तांतरण" म्हणजे, जमातीच्या व्यक्तीच्या जमिनीचे जमातीतर व्यक्तीच्या नावे, १ एप्रिल १९५७ रोजी सुरू होणाऱ्या व ६ जुलै १९७४ रोजी संपणाऱ्या मुदतीमध्ये एकतर,

(अ) विक्री, देणगी, अदलाबदल, गहाण किंवा भाडेपट्ट्याने देऊन, किंवा हयात व्यक्तींमध्ये केलेली इतर कोणतीही व्यवस्था, या स्वरूपात पक्षकारांनी केलेल्या कृतीद्वारे, किंवा

(ब) न्यायालयाचा हुकूमनामा किंवा आदेश याअन्वये, किंवा

१९९१ चा महा. २४. (क) अशा जमातीच्या व्यक्तीकडून येणे असलेल्या जमीन महसुलाच्या कोणत्याही रकमेच्या वसुलीसाठी किंवा जमीन महसुलाची थकबाकी म्हणून किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० किंवा त्यावेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा याअन्वये अन्यप्रकारे त्याच्याकडून येणे असलेली इतर कोणतीही रक्कम वसूल करण्यासाठी, जमातीच्या व्यक्तीच्या जमिनीचे जमातेतर व्यक्तीच्या नावे केलेले हस्तांतरण; परंतु त्यामध्ये, संहितेचे कलम ३६ पोटकलम (३) च्या परंतुकाखाली येणाऱ्या जमिनीच्या हस्तांतरणाचा समावेश होणार नाही, आणि "जमाती हस्तांतरणकर्ता" आणि "जमातीतर हस्तांतरिती, या शब्दप्रयोगांचा त्याप्रमाणे अर्थ लावण्यात येईल ;

(जे) "जमातीची व्यक्ती" म्हणजे, संहितेच्या कलम ३६ च्या स्पष्टीकरणाच्या अर्थानुसार अनुसूचित जमातीतील व्यक्ती, आणि त्यामध्ये, त्याच्या हितसंबंधातील उत्तराधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(के) "जमाती हस्तांतरणकर्ता" या शब्दप्रयोगात त्याच्या हितसंबंधातील उत्तराधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(एल) "जमातेतर हस्तांतरिती" या शब्दप्रयोगात त्याच्या हितसंबंधातील उत्तराधिकाऱ्याचा समावेश होतो आणि जर त्याने किंवा त्याच्या उत्तराधिकाऱ्याने १५ मार्च १९७१ रोजी किंवा तद्नंतर जमातीच्या किंवा जमातेतर कोणत्याही व्यक्तीच्या नावे जमीन हस्तांतरित केली असेल तर त्यामध्ये अशा व्यक्तींचासुद्धा समावेश होतो.

(२) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना संहितेत अथवा यथास्थिति, संबंधित कुळवहिवाट कायद्यात जे अर्थ नेमून दिलेले आहेत तेच अर्थ असतील.

**३.** (१) हस्तांतरणामुळे ज्याबाबतीत,— विवक्षित प्रकरणात जमातीच्या व्यक्तींना जमिनी प्रत्यर्पित किंवा हस्तांतरित करणे.

(अ) जमाती हस्तांतरणकर्त्याची जमीन जमातेतर हस्तांतरितीने धारण केली असेल, किंवा

(ब) जमाती हस्तांतरणकर्त्याने अदलाबदल करून संपादन केलेली जमीन, ही अदला-बदलीत दिलेल्या जमिनीच्या मूल्यापेक्षा कमी मूल्याची असेल,

आणि अशा तऱ्हेने हस्तांतरित केलेली जमीन ही, जमातेतर हस्तांतरितीच्या कब्जात असेल आणि, ६ जुलै १९७४ रोजी किंवा तत्पूर्वी ती कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी वापरात आणण्यात आली नसेल, त्या बाबतीत, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यात अथवा कोणत्याही न्यायालयाचा, न्यायाधिकरणाचा अथवा प्राधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, हुकूमनामा अथवा आदेश यात काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकारी, एकतर स्वाधिकारे कोणत्याही वेळी अथवा या अधिनियमाच्या प्रारंभापासून [१] [तीस वर्षाच्या आत] जमाती हस्तांतरणकर्त्याने केलेल्या अर्जावरून, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, असा निदेश देईल की,—

(एक) जमाती हस्तांतरणकर्ता व जमातेतर हस्तांतरिती यांनी अशा तऱ्हेने अदलाबदल केलेल्या जमिनी एकमेकांना प्रत्यर्पित करण्यात येतील ; आणि जमाती हस्तांतरणकर्ता अथवा यथास्थिति, जमातेतर

---

१ सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १, कलम ५ अन्वये 'तीन वर्षाच्या आत' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

हस्तांतरिती, पोटकलम (४) च्या खंड (अ) अन्वये निर्धारित केल्याप्रमाणे सुधारणांच्या मूल्यातील फरकाची रक्कम देईल, किंवा

(दोन) अदलाबदलीखेरीज अन्यरीतीने हस्तांतरित करण्यात आलेली जमीन, जमातेतर हस्तांतरितीच्या कब्जातून घेऊन ती सर्व भारांपासून मुक्त जमाती हस्तांतरणकर्त्याला प्रत्यर्पित करण्यात येईल आणि जमाती हस्तांतरणकर्ता, अशा हस्तांतरितीला व भारविषयक दावा सांगणाऱ्या इतर व्यक्तींना, पोटकलम (४) च्या खंड (ब) अन्वये निर्धारित करण्यात आलेली रक्कम देईल.

परंतु, अशा जमातेतर हस्तांतरितीची जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादन करण्यात आल्यामुळे तो भूमिहीन झाल्यानंतर, ६ जुलै १९७४ पूर्वी, जमाती हस्तांतरणकर्त्याने जमातेतर हस्तांतरितीच्या नावे जमीन हस्तांतरित केली असेल त्याबाबतीत, अशारीतीने हस्तांतरित केलेल्या जमिनीपैकी केवळ निम्मी जमीन जमाती हस्तांतरणकर्त्याला प्रत्यर्पित करण्यात येईल.

[१] [**स्पष्टीकरण---**जेव्हा जमातीतील व्यक्ती व जमातेतर व्यक्ती यांच्या जमिनी अदलाबदली व्यतिरिक्त, इतर प्रकारे एकमेकांकडे हस्तांतरित करण्यात आल्याचे अभिप्रेत असेल परंतु, अशा बदलाबदलीसंबंधीच्या लेखांची ज्या दिनांकास नोंदणी करण्यात आली असेल तो दिनांक एकच असेल त्याबाबतीत, किंवा अशा लेखांची नोंदणी निरनिराळ्या दिनांकांना करण्यात आलेली असेल परंतु नोंदणीच्या त्या दिनांकाचा मधला कालावधी हा तीस दिवसांचा किंवा त्यापेक्षा कमी असेल त्याबाबतीत, अशा लेखांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाच्या प्रयोजनार्थ अशी हस्तांतरणे अदलाबदलीद्वारे झाल्याचे मानण्यात येईल.]

[२] [ (एक-अ) ज्याबाबतीत जमातीतील हस्तांतरकाने जमातेतर हस्तांतरितीस अदलाबदली व्यतिरिक्त अन्य मार्गाने हस्तांतरित केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही जमिनीच्या बाबतीत महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी (सुधारणा) अधिनियम, १९७७ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी (यात यापुढे ज्याचा निर्देश "प्रारंभाची तारीख" असा करण्यात आला आहे) पोटकलम (१) च्या खंड (दोन) अन्वये कोणतीही कार्यवाही करण्यात आली असेल, आणि १९७७ चा महा. ५७.

(अ) अशी कार्यवाही प्रारंभाच्या दिनांकास जिल्हाधिकाऱ्यापुढे किंवा कोणत्याही अपील किंवा पुनरीक्षण प्राधिकाऱ्यापुढे अनिर्णित असेल आणि दोन्ही पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याची किंवा अशा प्राधिकाऱ्याची अशी खात्री पटली असेल की, पोटकलम (१) च्या स्पष्टीकरणाच्या अर्थानुसार पक्षकारांमध्ये अदलाबदलीच्या रूपाने जमिनीची हस्तांतरणे झालेली होती, त्याबाबतीत---

(एक) जर अशी कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यापुढे अनिर्णित असेल तर जिल्हाधिकारी अदलाबदल करण्यात आल्याचे मानण्यात येणाऱ्या जमिनीच्याबाबतीत पोटकलम (१), खंड (एक) अन्वये नव्याने चौकशी करील ;

(दोन) जर अशी कार्यवाही, अपील किंवा पुनरीक्षण प्राधिकाऱ्यापुढे अनिर्णित असेल तर असा प्राधिकारी जिल्हाधिकाऱ्याचा आदेश रद्द करील आणि जिल्हाधिकाऱ्यास, अदलाबदल झाल्याचे मानण्यात येणाऱ्या जमिनीच्या बाबतीत पोटकलम (१), खंड (एक) अन्वये नव्याने चौकशी करण्याचा निदेश देईल ;

(ब) अशी कार्यवाही जिल्हाधिकाऱ्याकडून किंवा अशा कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून पूर्ण करण्यात आली असेल, परंतु, प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीत अदलाबदल करणाऱ्यापैकी कोणत्याही पक्षकाराने केलेल्या अर्जावरून किंवा स्वाधिकारे, जिल्हाधिकाऱ्याची, दोन्ही पक्षकारांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर अशी खात्री पटली असेल की, पोटकलम (१) च्या

---

१ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ५७, कलम २ (अ) अन्वये हे स्पष्टीकरण नेहमीकरिता जादा दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

२ वरील अधिनियमाच्या क्र. ५७, कलम २ (ब) अन्वये पोटकलम (एक-अ) समाविष्ट करण्यात आले.

स्पष्टीकरणाच्या अर्थानुसार पक्षकारांमध्ये अदलाबदलीच्या स्वरूपात जमिनीची हस्तांतरणे झालेली होती, तर जिल्हाधिकारी परिस्थिती पूर्ववत करण्यासाठी आवश्यक ते आदेश तात्काळ देईल आणि त्यानंतर, अदलाबदल झाल्याचे मानण्यात येणाऱ्या जमिनीच्या संबंधात पोटकलम (१), खंड (एक) अन्वये नव्याने चौकशी करील.]

(२) पोटकलम (१) च्या खंड (एक) अन्वये जमातीच्या व्यक्तीला अथवा जमातेतर व्यक्तीला प्रत्यर्पित करण्यात आलेल्या कोणत्याही जमिनीवर भार निर्माण करण्यात आलेले असतील त्याबाबतीत ते भार तेथून हस्तांतरित करण्यात येतील आणि, ते यथास्थिति, जी जमीन जमातीच्या अथवा जमातेतर व्यक्तीला प्रत्यर्पित करण्यात आली असेल त्या जमिनीशी संलग्न होतील.

(३) राज्यात त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी जमाती हस्तांतरणकर्त्याला, जर तो जमीन जातीने कसण्याची आणि पोटकलम (४) च्या तरतुदीखाली जिल्हाधिकारी निर्धारित करील अशी रक्कम, जमातेतर हस्तांतरितीला देण्याची हमी देईल तरच केवळ या कलमान्वये जमीन परत मिळण्याचा हक्क असेल :

परंतु, अज्ञान व्यक्तीच्या बाबतीत, तिचा पालक आणि विकलांग असलेल्या कोणत्याही इतर व्यक्तीच्या बाबतीत तिचा प्राधिकृत अभिकर्ता हमी देऊ शकेल.

(४) (अ) पोटकलम (१), खंड (एक) अन्वये जमिनी प्रत्यर्पित करण्यात आलेल्या असतील त्याबाबतीत जिल्हाधिकारी, जमाती हस्तांतरणकर्ता अथवा जमातेतर हस्तांतरिती यांच्याकडून अशा अदलाबदलीनंतर, जमिनीत कोणत्याही सुधारणा करण्यात आल्या असतील तर, विहित रीतीने, सुधारणांचे मूल्य निर्धारित करील. जमाती हस्तांतरणकर्त्याने केलेल्या सुधारणांचे मूल्य अधिक असल्याचे आढळून आले तर, जमातेतर हस्तांतरितीकडून जमाती हस्तांतरणकर्त्याला फरकाची रक्कम देय होईल आणि जमातीतर हस्तांतरितीने केलेल्या सुधारणांचे मूल्य अधिक असल्याचे आढळून आले तर जमाती हस्तांतरणकर्त्याकडून जमातेतर हस्तांतरितीला फरकाची रक्कम देय होईल.

(ब) पोटकलम (१), खंड (दोन) अन्वये जमाती हस्तांतरणकर्त्याला प्रत्यर्पित करण्यात आलेल्या जमिनीकरिता त्याच्याकडून देय असलेल्या रकमेत जमिनीच्या आकारणीच्या ४८ पट रकमेइतकी रक्कम अथवा जमिनीच्या संपादनाकरिता जमातीतर हस्तांतरितीकडून देण्यात आलेली मोबदल्यादाखलची रक्कम, यापैकी जी कमी असेल ती रक्कम, अधिक, जमातीतर हस्तांतरितीकडून तीत कोणत्याही सुधारणा करण्यात आलेल्या असल्यास विहित रीतीने जिल्हाधिकाऱ्याकडून निर्धारित करण्यात येईल असे त्या सुधारणांचे मूल्य, यांचा समावेश असेल.

**स्पष्टीकरण---**खंड (अ) अथवा खंड (ब) अन्वये कोणत्याही सुधारणांचे मूल्य निर्धारित करताना जिल्हाधिकारी पुढील गोष्टी विचारात घेईल :---

(एक) सुधारणांसाठी तरतूद केलेले अथवा खर्च केलेले श्रम व भांडवल ;

(दोन) सुधारणांची सध्याची स्थिती ;

(तीन) असे निर्धारण करण्यात येईल त्या वर्षाच्या लगतनंतरच्या दहा वर्षाच्या मुदतीत केलेल्या सुधारणांपासून जमिनीस मिळण्याची शक्यता असलेल्या लाभाची व्याप्ती ; आणि

(चार) विहित करण्यात येतील असे इतर घटक.

(क) खंड (अ) अन्वये जिल्हाधिकाऱ्याकडून निर्धारित करण्यात आल्याप्रमाणे, सुधारणांच्या मूल्यातील फरक दर्शविणारी रक्कम देण्यास जबाबदार असल्याचे आढळून येईल असा जमाती हस्तांतरणकर्ता अथवा, यथास्थिति, जमातेतर हस्तांतरिती, उक्त रक्कम जमातेतर हस्तांतरितीला अथवा यथास्थिति, जमाती हस्तांतरणकर्त्याला, एकतर ठोक रकमेत अथवा जिल्हाधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे (प्रतिवर्षी $४^{१}/_{२}$ टक्के दराने सरळ व्याजासह) बारापेक्षा अधिक असणार नाहीत इतक्या वार्षिक हप्त्यात देईल.

(ड) या कलमाच्या [१] [ पोटकलम (१) खंड (दोन) अन्वये] ज्याला जमीन प्रत्यर्पित करण्यात आली असेल असा जमाती हस्तांतरणकर्ता, जमातेतर हस्तांतरितीस व भारविषयक दावा सांगणाऱ्या इतर व्यक्तींना या पोटकलमान्वये निर्धारित केलेली रक्कम, एकतर ठोक रकमेत अथवा जिल्हाधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे (प्रतिवर्षी ४$^{१}/_{२}$ टक्के दराने सरळ व्याजासह) बारापेक्षा अधिक होणार नाहीत अशा वार्षिक हप्त्यात देईल.

(ई) खंड (ब) अन्वये निर्धारित करण्यात आलेल्या रकमेचे हस्तांतरिती आणि भारविषयक दावा सांगणाऱ्या व्यक्ती यांच्यामधील संविभाजन हे जिल्हाधिकाऱ्याकडून पुढील पद्धतीने निर्धारित करण्यात येईल :—

(एक) जर जमिनीवरील भारांचे एकूण मूल्य हे खंड (ब) अन्वये निर्धारित करण्यात आलेल्या रकमेपेक्षा कमी असेल तर, त्या भारधारकांना भारांचे मूल्य पूर्णपणे देण्यात येईल :

(दोन) जर जमिनीवरील भारांचे एकूण मूल्य हे, खंड (ब) अन्वये निर्धारित करण्यात आलेल्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, प्राथम्यक्रमाने भागधारकांमध्ये त्या रकमेचे वाटप करण्यात येईल ;

परंतु खंड (ड) व (ई) यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे जमातेतर हस्तांतरितीच्या विरुद्ध कोणत्याही इतर रीतीने अथवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याखाली त्याच्या हक्काच्या अंमलबजावणी प्रीत्यर्थ कार्यवाही करण्यासंबंधातील कोणत्याही भागधारकाच्या हक्कास बाधा पोचणार नाही.

(फ) संबंधित कुळवहिवाट कायद्यान्वये ज्या कालावधीसाठी खंड देण्याचे निलंबित करण्यात आले असेल किंवा खंड देण्यापासून सूट देण्यात आली असेल अशा कोणत्याही कालावधीत, जमाती हस्तांतरणकर्त्यास किंवा यथास्थिति, जमातेतर हस्तांतरितीस या कलमान्वये निर्धारित केलेली ठोक रक्कम किंवा कोणत्याही हप्त्याची रक्कम किंवा त्यावरील व्याज कोणतेही असल्यास ते, देणे बंधनकारक असणार नाही.

(ग) जमाती हस्तांतरणकर्ता किंवा यथास्थिति, जमातेतर हस्तांतरिती, ठोक रक्कम देण्यात कसूर करील किंवा त्याच्याकडे दोन किंवा अधिक हप्त्याची थकबाकी राहील तर अशारीतीने चुकती न केलेली उर्वरित रक्कम (दरसाल दर शेकडा ४$^{१}/_{२}$ या दराने त्यावरील व्याजासह) जमीन महसुलाची थकबाकी असल्याप्रमाणे, जिल्हाधिकाऱ्याद्वारे वसूल करण्यात येईल. अशारीतीने वसूल करण्यात आलेली रक्कम जिल्हाधिकाऱ्याकडून जमातीतर हस्तांतरितीस आणि भारविषयक दावा सांगणाऱ्या व्यक्ती, कोणत्याही असल्यास, त्यांना किंवा यथास्थिति, जमाती हस्तांतरणकर्त्यास देण्यात येईल.

अनुसूचित जमातीतील व्यक्तींच्या मालकीच्या जमिनी प्रत्यर्पित करणे.

**४.** दिनांक १ एप्रिल, १९५७ रोजी किंवा त्यानंतर आणि ६ जुलै, १९७४ पूर्वी कोणत्याही वेळी, जमातीच्या व्यक्तीची कोणतीही जमीन संबद्ध कुळवहिवाट कायद्याच्या तरतुदीअन्वये किंवा त्यास अनुसरून एखाद्या जमातेतर हस्तांतरितीने खरेदी केली असेल किंवा खरेदी किंवा संपादित करण्यात आल्याचे मानण्यात येत असेल त्याबाबतीत, किंवा अशा कायद्यान्वये शास्तीची रक्कम देऊन असे कोणतेही संपादन नियमित करण्यात आले असेल आणि अशी जमीन, अशा जमातेतर हस्तांतरितीच्या कब्जात असेल आणि दिनांक ६ जुलै, १९७४ रोजी किंवा तत्पुर्वी, ती कोणत्याही अकृषिक वापरात आणली गेली नसेल त्याबाबतीत, त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, जिल्हाधिकारी, एकतर स्वाधिकारे, कोणत्याही वेळी, किंवा या अधिनियमाच्या प्रारंभापासून [२][तीस वर्षाच्या आत] जमातीच्या व्यक्तीने अर्ज केल्यानंतर आणि

१ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३०, कलम ४ द्वारे "पोटकलम (१) च्या खंड (एक) अन्वये" हा मजकूर नेहमीकरिता दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

२ सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १, कलम ६ अन्वये 'तीन वर्षाच्या आत' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, असा निदेश देईल की, कलम ३, पोटकलम (४) च्या अधीन राहून, जमीन जमातीच्या व्यक्तीला सर्व भारापासून मुक्त, प्रत्यर्पित करण्यात येईल आणि संबद्ध कुळवहिवाट कायद्यास अनुसरून अशा जमिनीच्या संबंधात अशा जमातेतर हस्तांतरितीस देण्यात आलेली खरेदी किंमतीची रक्कम किंवा तिचा प्रमाणशीर भाग, अशा जमातेतर खरेदीदारास एकतर ठोक रकमेत किंवा जिल्हाधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे बारापेक्षा अधिक नसतील अशा वार्षिक हप्त्यामध्ये (दरसाल दरशेकडा ४$^{१}/_{२}$ या दराने सरळ व्याजासह) परत करण्यात येईल. कलम ३, पोटकलम (४), खंड (ड), (ई), (फ) आणि (ग) च्या तरतुदी, शक्यतोवर जमातीच्या व्यक्तीकडून रकमेच्या वसुलीच्या संबंधात आणि ती जमातीतर व्यक्तीस आणि भारविषयक दावा सांगणाऱ्या व्यक्तीस, कोणत्याही असल्यास, देण्यासंबंधात लागू होतील.

परंतु, जमातेतर हस्तांतरितीची जमीन सार्वजनिक प्रयोजनसाठी संपादन करण्यात आल्यामुळे तो भूमिहीन झाल्यानंतर, ६ जुलै, १९७४ पूर्वी, जमातेतर हस्तांतरितीने जमीन खरेदी किंवा संपादित केली असेल त्याबाबतीत अशारीतीने खरेदी किंवा संपादित केलेल्या जमिनीपैकी निम्मी जमीन जमाती हस्तांतरणकर्त्याला प्रत्यर्पित करण्यात येईल.

**५.** कलम ३, पोटकलम (१), खंड (दोन) किंवा कलम ४ अन्वये जमीन प्रत्यर्पित करण्यात यावी असा आदेश दिल्यानंतर [१][किंवा कलम ५ अ च्या पोटकलम (१) अन्वये जमीन राज्य शासनाकडे निहित करण्यात आल्यानंतर] जमातीतर हस्तांतरिती जमीन कब्जात ठेवण्याचे चालू ठेवील तर असा जमातेतर हस्तांतरिती, (ज्यावर्षी जमीन जमातीच्या व्यक्तीला प्रत्यर्पित करण्याबद्दल आदेश देण्यात आला असेल त्या वर्षीच्या लगतनंतरच्या वर्षापासून) [२][आधीच्या प्रकरणी] जमातीच्या व्यक्तीस [२][आणि नंतरच्या प्रकरणी राज्य शासनास] जमिनीचा कब्जा देण्यात येईल तोपर्यंतच्या मुदतीसाठी, जिल्हाधिकारी त्या जमिनीच्या वापरासाठी व भोगवट्यासाठी विहित रीतीने निश्चित करील अशी रक्कम जमातीच्या व्यक्तीस [३][किंवा यथास्थिति, राज्य शासनास] देईल.

विवक्षित प्रकरणी जमिनीचा भोगवाटा केल्याबद्दल भरपाई.

(२) जर जमातेतर हस्तांतरिती जिल्हाधिकाऱ्याने पोटकलम (१) अन्वये निश्चित केलेली रक्कम देण्यात कसूर करील तर ती रक्कम जिल्हाधिकाऱ्याद्वारे जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसूल करण्यात येईल.

[४][**५-अ (१)** कलम ३, पोटकलम (१) अन्वये जमातीतील हस्तांतरणकर्त्याकडे प्रत्यर्पित करण्यास योग्य असलेली, (अदलाबदल करून संपादन केलेली नसेल अशी) कोणतीही जमीन एकतर जमातीतील हस्तांतरणकर्त्याने कलम ३, पोटकलम (३) मध्ये निर्देशिलेली हमी देण्यात कसूर केल्यामुळे अथवा कोणत्याही कारणामुळे अशा प्रकारे प्रत्यर्पित करता येत नसेल त्याबाबतीत, किंवा जिल्हाधिकाऱ्याने केलेल्या चौकशीच्या वेळी जमातीतील व्यक्तीने उक्त कलम ४ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे खरेदी किंमत किंवा तिचा प्रमाणशीर भाग जमातीतर व्यक्तीस परत करण्याबाबत तिची अनिच्छा व्यक्त केल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे कलम ४ मध्ये निर्देशिलेली कोणतीही जमीन अशा जमातीतील व्यक्तीकडे प्रत्यर्पित करता येत नसेल त्याबाबतीत जिल्हाधिकाऱ्यास, त्याबाबतीत केलेल्या नियमास अधीन कोणतेही असल्यास, लेखी आदेशाद्वारे आदेशाच्या दिनांकापासून सर्व भारापासून मुक्त संपादन करण्यात आली असल्याचे व राज्य शासनाकडे निहित झाली असल्याचे मानण्यात येईल, असा निदेश देता येईल.

प्रत्यर्पित करणे शक्य नसेल अशा जमिनी शासनाकडे निहित होणे व विवक्षित निर्बंधाच्या अधीन त्या जमातीच्या इतर व्यक्तींना देणे.

---

१ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ५ (अ) अन्वये हे शब्द नेहमीकरता जादा दाखल केल्याचे मानण्यात येईल.

२ वरील अधिनियमाच्या कलम ५ (ब) अन्वये हे शब्द नेहमीकरता दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

३ वरील अधिनियमाच्या कलम ५ (क) अन्वये हे शब्द नेहमीकरता दाखल करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

४ वरील अधिनियमाच्या कलम ६ अन्वये कलम ५-अ नेहमीकरता समाविष्ट केले असल्याचे मानण्यात येईल.

(२) जमीन अशा प्रकारे निहित झाल्यानंतर, जमातीतर हस्तांतरितीला राज्य शासनाकडून, जमिनीच्या आकारणीच्या ४८ पट इतकी रक्कम अधिक जमातेतर हस्तांतरितीने त्यास काही सुधारणा केल्या असल्यास, त्यांचे मूल्य मिळण्याचा हक्कदार असेल. जमिनीमधील सुधारणांचे मूल्य ठरविण्यासाठी व जमातेतर हस्तांतरिती आणि जमिनीवरील भारांवर दावा सांगणाऱ्या व्यक्ती, कोणत्याही असल्यास यांच्यामध्ये, भारांचे, संविभाजन करण्यासाठी कलम ३, पोटकलम (४) चे खंड (ब) व (ई) यांच्या तरतुदी योग्य त्या फेरफारासह लागू होतील.

(३) राज्य शासनाकडे पोटकलम (१) अन्वये अशा रीतीने निहित झालेली जमीन राज्य शासनाच्या त्या बाबतीतील कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाच्या अधीन, जिल्हाधिकाऱ्याकडून, ती जमीन ज्या गावात असेल त्या गावात किंवा त्या गावापासून पाच किलोमीटरच्या आत राहणाऱ्या व या अधिनियमाच्या आणि तद्न्वये केलेल्या नियमांच्या आदेशांच्या तरतुदीनुसार जमीन स्वीकारण्यास व जमीन जातीने कसण्याची हमी देण्यास तयार असलेल्या जमातीतील इतर कोणत्याही व्यक्तीला देण्यात येईल ; तथापि, अशा जमातीतील व्यक्तीने मालक म्हणून किंवा कूळ म्हणून, धारण केलेली एकूण जमीन ही संहितेच्या कलम ३६-अ, पोटकलम (६) च्या अर्थानुसार निर्वाहक क्षेत्रापेक्षा अधिक होणार नाही.

(४) पोटकलम (३) अन्वये जिला जमीन देण्यात आली असेल अशी व्यक्ती, राज्य शासनाला पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेली रक्कम, एकतर ठोक रकमेत किंवा जिल्हाधिकारी निदेश देईल त्याप्रमाणे बारापेक्षा अधिक होणार नाहीत अशा वार्षिक हप्त्यांनी (दरसाल दरशेकडा ४½% प्रमाणे सरळ व्याजासह) देईल आणि विहित करण्यात येतील अशा अटीस व शर्तीस अधीन राहून जमीन धारण करील.

(५) पोटकलम (३) अन्वये देण्यात आलेली कोणतीही जमीन, जिल्हाधिकाऱ्याच्या पुर्वमंजुरीवाचून, विक्री करून (दिवाणी न्यायालयाच्या हुकुमनाम्याची किंवा सक्षम प्राधिकरणाच्या निवाड्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करताना केलेल्या विक्रीसह) किंवा देणगी म्हणून देऊन, गहाण ठेवून, अदलाबदल करून, पट्ट्याने देऊन किंवा अन्यप्रकारे हस्तांतरित करण्यात येणार नाही. विहित करण्यात येईल अशा परिस्थितीमध्ये आणि राज्य शासनाला प्रिमिअम किंवा नजराणा देण्यासंबंधीच्या शर्तीसह, अशा शर्तीवर असेल ते खेरीजकरून अशी मंजुरी देण्यात येणार नाही :

परंतु, ज्याबाबतीत सशस्त्र बलामध्ये सेवा करणाऱ्या व्यक्तीकडून जमीन पट्ट्याने द्यावयाची असेल किंवा अशा जमिनीमध्ये कोणतीही सुधारणा करण्याकरिता कर्ज उभारण्यासाठी अधिनियमाच्या कलम ३६, पोटकलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे जमीन गहाण ठेवावयाची असेल त्याबाबतीत अशी कोणतीही मंजुरी आवश्यक असणार नाही.

(६) पोटकलम (५) अन्वये कोणत्याही हस्तांतरणास जिल्हाधिकाऱ्याकडून मंजुरी देण्यात आली असेल, तर जमिनीचे त्यानंतर होणारे हस्तांतरणदेखील पोटकलम (५) च्या तरतुदीच्या अधीन असेल.

(७) पोटकलम (५) किंवा (६) चे उल्लंघन करून केलेले जमिनीचे कोणतेही हस्तांतरण आणि तिचे कोणतेही संपादन हे अवैध असेल ; आणि त्याबद्दलची शास्ती म्हणून, हस्तांतरणकर्त्याचा आणि हस्तांतरितीचा अशा जमिनीमधील किंवा तिच्या संबंधातील कोणताही अधिकार, हक्क किंवा हितसंबंध, त्याला कारण दाखवण्याची संधी दिल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याकडून समपहृत केले जातील ; आणि जमीन तिच्यावरील उभ्या पिकांसह, कोणतीही असल्यास आणखी हस्तांतरणाशिवाय राज्य शासनाकडे निहित होईल व राज्य शासन वेळोवेळी निदेश देईल अशारीतीने तिची विल्हेवाट लावण्यात येईल.]

अपील. **६.** (१) संहितेत काहीही अंतर्भूत असले तरी जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध करावयाचे अपील हे संहितेखाली रचना करण्यात आलेल्या महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे करण्यात येईल.

१९६३ चा छत्तीस. (२) जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय किंवा आदेश मिळाल्याच्या तारखेपासून साठ दिवसाच्या मुदतीच्या आत असे प्रत्येक अपील करण्यात येईल. मुदत अधिनियम, १९६३ याची कलमे ४, ५, १२ व १४ यांच्या तरतुदी असे अपील दाखल करण्यास लागू होतील.

१९०८ चा पाच. (३) पोटकलम (१) अन्वये अपीलाचा निर्णय करताना महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण संहितेखाली त्या न्यायाधिकरणाकडून तयार करण्यात आलेल्या विनियमाच्या अधीनतेने, न्यायालयास जे अधिकार असतील त्या सर्व अधिकारांचा वापर करील आणि दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ अन्वये मूळ न्यायालयाच्या हुकुमनाम्यावरील किंवा आदेशावरील अपीलांचा निर्णय करताना न्यायालय जी कार्यपद्धती अनुसरते तीच कार्यपद्धती अनुसरील.

**७.** कलम ६, पोटकलम (२) द्वारे तरतूद करण्यात आलेल्या मुदतीत कोणतेही अपील दाखल करण्यात आले नसेल त्याबाबतीत, आयुक्तास, स्वतःहून किंवा राज्य शासनाच्या निदेशावरून, कोणत्याही वेळी— पुनरीक्षण.

(अ) जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या कोणत्याही आदेशाची वैधता किंवा औचित्य याबद्दल आणि यथास्थिति, अशा जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यवाहीच्या नियमिततेसंबंधी स्वतःची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही जिल्हाधिकाऱ्याच्या कोणत्याही चौकशीचे किंवा कामकाजाचे कागदपत्र मागविता येतील ; आणि

(ब) त्यावर त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

परंतु, राज्य शासनाने निदेश दिले असतील अशा प्रकारणांच्या बाबतीत असेल त्याव्यतिरिक्त अशा आदेशांच्या दिनांकापासून तीन वर्षे संपल्यानंतर अशी कोणतीही कागदपत्रे मागवण्यात येणार नाहीत आणि हितसंबंधित पक्षकारास उपस्थित राहून आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आल्याशिवाय जिल्हाधिकाऱ्याच्या कोणत्याही आदेशात फेरबदल करण्यात येणार नाही किंवा तो विलोपित करण्यात येणार नाही किंवा तो फिरवण्यात येणार नाही.

१९५९ चा मुंबई छत्तीस. **८.** मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांच्यापुढील प्रत्येक अपिलावर किंवा या अधिनियमाखालील अर्जावर विहित करण्यात येईल अशा मूल्याचा न्यायालय शुल्क मुद्रांक लावण्यात येईल. न्यायालय शुल्क.

**९.** या अधिनियमाअन्वये जिल्हाधिकाऱ्याने दिलेला प्रत्येक निर्णय किंवा आदेश हा, कलम ६ खाली त्याविरुद्ध महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे अपील करता येईल या गोष्टीस अधीन असेल व अपिलातील महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाचा निर्णय हा अंतिम व निर्णायक असेल आणि त्याविरूद्ध कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत आक्षेप घेण्यात येणार नाही. जिल्हाधिकाऱ्याचा निर्णय किंवा आदेश आणि महसूल न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असणे.

[1] [**९-अ.** या अधिनियमात किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाखाली जिल्हाधिकारी, आयुक्त किंवा महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांच्यासमोर चाललेल्या कोणत्याही कार्यवाहीत, कोणत्याही पक्षाच्या वतीने, उपस्थित राहण्याचा कोणत्याही विधिज्ञास हक्क असणार नाही ; विधिज्ञ, इत्यादींना हजर राहण्यापासून वगळणे.

परंतु असे की, एखादा पक्षकार अज्ञान किंवा वेडा असल्यास त्याच्या पालकास व इतर कोणतीही व्यक्ती असमर्थ असेल अशा प्रकरणात तिच्या प्राधिकृत एजंटास अशा कार्यवाहीत उपस्थित राहता येईल.

**स्पष्टीकरण :---**या कलमाच्या प्रयोजनासाठी "विधिज्ञ"या संज्ञेत अधिवक्ता, वकील किंवा इतर कोणताही विधि व्यवसायी यांचा समावेश होतो.]

---

१ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १२, कलम ४ अन्वये कलम ९-अ समाविष्ट करण्यात आले.

दिवाणी न्यायालय किंवा प्राधिकरण यांच्या अधिकारितेस रोध.

**१०.** या अधिनियमाखाली ज्या कोणत्याही प्रश्नासंबंधातील निर्णय किंवा कार्यवाही जिल्हाधिकाऱ्याने, आयुक्ताने, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने किंवा राज्य शासनाने करणे आवश्यक असेल अशा कोणत्याही प्रश्नासंबंधात तडजोड करण्याची किंवा निर्णय करण्याची किंवा कार्यवाही करण्याची अधिकारिता कोणत्याही दिवाणी न्यायालयास असणार नाही.

जमिनीचा कब्जा प्रत्यर्पित करण्याचा व तीवर कब्जा असलेल्या व्यक्तीस निष्कासित करण्याचा अधिकार.

[१][ **१०-अ** कलम ५ मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदीत किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीअन्वये कोणत्याही जमातीतील हस्तांतरकाकडे किंवा जमातेतर हस्तांतरितीकडे कोणत्याही जमिनीचा कब्जा प्रत्यर्पित करण्यात येईल त्याबाबतीत, जिल्हाधिकाऱ्याने, जमिनी कब्जात ठेवण्याचा हक्क नसणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस किंवा ती सदोषरीत्या कब्जात असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस संहितेच्या कलम २४२ अन्वये तरतूद केलेल्या रीतीने, कोणत्याही वेळी, निष्कासित करणे हे नेहमीच विधि संमत असेल.]

नियम करण्याचा अधिकार.

**११.** (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीनतेने या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील. अशा नियमांमध्ये, चौकशांची कार्यपद्धती आणि या अधिनियमाच्या ज्या प्रयोजनासाठी फी बद्दल विशिष्ट तरतूद करण्यात आली नसेल, अशा कोणत्याही प्रयोजनासाठी फी बसविण्याची तरतूद करता येईल.

(२) या अधिनियमान्वये केलेला प्रत्येक नियम, तो केल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीसाठी, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगेच नंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरफार करण्यासंबंधी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल किंवा नियम करण्यात येऊ नये या विषयी दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि असा निर्णय **शासकीय राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल तर तो नियम अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून केवळ अशा फेरफार केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल. किंवा यथास्थिति, अंमलात येणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही फेरबदलामुळे किंवा विलोपनामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

---

१ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५७, कलम ३ अन्वये कलम १०-अ समाविष्ट करण्यात आले.

एच १२८२-७,५५५ पु.-१०-२०१३

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर.

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१.
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१.
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **पर्यवेक्षक**
  शासकीय ग्रंथागार, पैठण रोड, रेल्वे स्टेशनजवळ,
  औरंगाबाद-४३१ ००१.
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३.
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते